# मुंबई विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

वेबसाईट :-www.nssmu.org
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**


पत्र.क्र.रासेयो/आयसीडी/२०२३-२४/१४६
दिनांक : २८.०७.२०२३

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मुंबई विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालये.(मुंबई शहर जिल्हा)

**विषय** : ०१ ऑगस्ट महसूल दिन व ०१ ऑगस्ट ते ०७ ऑगस्ट महसूल सप्ताह साजरा करणेबाबत.

**संदर्भ** : जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांचे पत्र क्र. रवका/महसूल सप्ताह/इतिवृत्त/२०२३, दि. २० जुलै,२०२३ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयांकित प्रकरणी मा.जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत दि. ०१ ऑगस्ट महसूल दिन व ०१ ऑगस्ट ते ०७ ऑगस्ट महसूल सप्ताह साजरा करणेकरीता चर्चा करण्यात आली.

उपरोक्त संदर्भात ०१ ऑगस्ट महसूल दिन व ०१ ऑगस्ट ते ०७ ऑगस्ट महसूल सप्ताह साजरा करण्याच्या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जिल्हयांतील शाळा/महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे दाखले प्राप्त करण्याबाबत मार्गदर्शन करणे व ऑनलाईन दाखले प्राप्त करण्याकरीता शासनामार्फत प्रचार व प्रसिध्दी करण्यात यावी.

वॉर्ड निहाय शाळा/महाविद्यालय निश्चित करून तेथे ऑनलाईन दाखले प्राप्त करण्याकरीता शासनामार्फत प्रचार व प्रसिध्दी करणे उदा. फलक लावणे, प्रत्यक्ष महाविद्यालयात कॅम्प आयोजित करणे इत्यादी उपक्रम राबविण्यात यावेत.

**आपला**

सुशील शिंदे
**विशेष कार्य अधिकारी, (रा.से.यो.)**

-sd-
**सुधीर पुराणिक**
**संचालक, रा.से.यो., मुंबई विद्यापीठ**